**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**

Web : www.dhepune.gov.in E-mail : dhepune@nic.in
फोन नं. ०२०/२६१२२११९, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

क्रमांक-अर्थसं-२०१५-१६/(१४२/१५)/अनडू/लेखा-२ 7118 दिनांक- १०.७.२०१५

14 JUL 2015

प्रति,

उच्च शिक्षण संचालनालयाचे अधिपत्त्याखालील
सर्व आहरण व संवितरण अधिकारी

**विषयः- बीम्स् प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकारी यांना दिलेली प्राधिकार पत्र (B.D.S) रद्द (UNDO) करण्याची सूविधा बंद करणेबाबत**

**संदर्भः-**१. शासनपरिपत्रक -संकिर्ण १०१०/प्र.क्र.७८/कोषा प्र-५ दिनांक १२.२.२०१५
२. संचालनालयाचे पत्र अर्थसं/( /१५)रायो/लेखा-२/४७१९ दि.१३.५.२०१५

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ शासन परिपत्रकाने बीम्स प्रणालीवर आहरण व संवितरण अधिकारी यांना दिलेली प्राधिकार पत्र (B.D.S) रद्द (UNDO) करण्याची सूविधा बंद करणेत आलेली आहे.दिनांक१२.२.२०१५ चे शासन परिपत्रकानूसार संचालनालयाचे संदर्भ क्र.२ ने आपणास कळविण्यात आलेले आहे.

राज्यातील शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण यांचे अधिपत्त्याखाली येणा-या आहरण व संवितरण अधिकारी दरमहा करावयाच्या खर्चासाठी बीम्सप्रणालीवरुन प्राधिकार पत्रे काढतात.

तथापी काढण्यात आलेल्या प्राधिकार पत्रा पैकी अनेक प्राधिकार पत्रे रद्द (UNDO) करण्यासाठी नियंत्रक अधिका-यांचे (उच्च शिक्षण संचालनालय) बीम्स प्रणालीवर दिसून येतात. अशा प्राधिकार पत्राचीं संख्या मोठया प्रमाणावर आहे.

सदरची प्राधिकारपत्र रद्य करण्यासाठी संबधीत आहरण व संवितरण अधिका-यांकडून संचालनालयास संदर्भीय शासन परिपत्रकानूसार प्राधिकार पत्र (B.D.S) रद्द (UNDO) करण्याचे प्रस्ताव सादर केले जात नाहीत. अथवा अत्यंत विलंबाने सादर केले जातात, अथवा ऐनवेळी सादर केले जातात अथवा ऐनवेळी दूरध्वनीवर प्राधिकारपत्र रद्य करण्याबाबत विनंती करण्यात येते. त्यामध्ये देण्यात येणारी माहिती अत्यंत त्रोटक स्वरुपाची असते. प्राधिकारपत्र रद्य करण्याबाबत कोणताही संयुक्तीक खुलासा केलेला नसतो. अशा पध्दतीने सादर होणा-या

प्रस्तावावर कार्यवाही करण्यात येणार नाही किंवा याबाबत काही कळविण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच वरील कारणास्तव तरतूद अखर्चित राहील्यास आहरण व संवितरण अधिका-यास जबाबदार धरले जाईल.

प्राधिकार पत्र (B.D.S) रद्द (UNDO) करण्यासाठी खालील तक्त्यात माहिती देऊन रद्द करण्याबाबत संयुक्तीक खुलासा सादर करावा.

| डीडीओ कोड | पदनाम/ कार्यालयाचे नाव | प्राधिकारपत्र व दिनांक | ग्रॅन्ट क्र. | मुख्य लेखाशिर्ष | योजना | तपशीलवार लेखाशीर्ष | स्थूल रक्कम | निव्वळ रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

(डॉ.वि.रा.मोरे)
सहसंचालक,उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य,पुणे.